# लोकाशा

संपादक – विजयराज बंब    Email- majhalokasha@gmail.com    9225939491

वर्ष १९ वे | अंक ३१२ | मंगळवार दि. १७ फेब्रुवारी २०२६ | No-L/18/RNP/06/Beed/2013-15 | बीड, छत्रपती संभाजीनगर-जालना, लातूर-धाराशिव नांदेड-परभणी-हिंगोली येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक | पाने ८ | किंमत ४ रु.


## सुनेत्रा पवार राष्ट्रवादीच्या नव्या राष्ट्रीय अध्यक्ष



मुंबई, दि.१७( लोकाशा न्यूज राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून सुनेत्रा पवार यांच्या नावाची घोषणा झाली आहे. राष्ट्रवादीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांनी बैठकीमध्ये राष्ट्रीवादीच्या राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून सुनेत्रा पवार यांच्या नावाची घोषणा केली असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. देवगिरीमध्ये पार पडलेल्या बैठकीमध्ये प्रफुल्ल पटेल यांनी राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून सुनेत्रा पवार यांच्या नावाची घोषणा केली आहे, प्रफुल पटेल यांच्याकडून नावाची घोषणा झाल्यानंतर सर्व आमदारांकडून हात वर करून सुनेत्रा पवार यांच्या नावाला समर्थन देण्यात ▶पान ४ वर

# अधिवेशनात होणार राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी

## फडणवीस सरकारचे दमदार पाऊल; बीड डीसीसीचे ६० हजार शेतकरी कर्जमुक्त होणार

बीड/परळी, दि. १६ (लोकाशा न्यूज) : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सरकार पुन्हा एखदा बीडसह संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांना पावणार आहे. कारण हे सरकार बोलल्याप्रमाणे येत्या ३० जुनला शेतकऱ्यांची कर्जमाफी करणार आहे. त्याअनुषंगानेच सध्या शेतकऱ्यांकडून कागदपत्रे मागवून घेण्यात येत आहेत. २३ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातच बजेटची तरतूद केली जाणार आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे बीड डीसीसीची तब्बल साडे चारशे कोटींची कर्जमाफी होण्याची शक्यता आहे. यातून जिल्ह्यातील साठ हजार शेतकरी कर्जमुक्त होणार आहे. यामुळे पुन्हा जिल्हा बँकेला चांगले दिवस येणार असून नव्याने कर्ज वाटपालाही गती मिळणार आहे. ▶▶पान ४ वर



**जिल्हा बँकेला मिळणार साडेचारशे कोटी**

### डीसीसीच्या शेतकऱ्यांकडे तीस तीस वर्षांपासूनचे कर्ज थकलेले

बीड डीसीसीचे शेतकऱ्यांकडे जवळपास साडे चारशे ते पाचशे कोटींची थकबाकी आहे. तीस तीस वर्षांपासूनही काही शेतकऱ्यांकडे कर्ज थकलेले आहे. आता हेच कर्ज माफ होणार आहे. या माफीमुळे पुन्हा जिल्हा बँक सुरूळीत होणार आहे.

### शेतकऱ्यांनो, दोन दिवसात आधार कार्ड जमा करा – शरद ठोंबरे

बीड जिल्हयातील सर्व शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की, राज्यातील शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातुन सोडवणूक करण्यासाठी आपत्कालीन व दीर्घकालिन उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने शेती कर्जाची माहिती पोर्टलवर भरण्याबाबत शासनाचे युध्द पातळीवर कामकाज सुरु असुन ही माहिती शासनाने पोर्टलवर भरण्यासाठी सर्व थकबाकीदार शेतकऱ्यांचे केवायसी करणे आवश्यक असल्यामुळे त्यांचे आधार नंबर आवश्यक आहेत. तरी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्या आणि बँकेकडे बहुतांश शेतकऱ्यांचे आधार कार्ड उपलब्ध नाहीत त्यामुळे सर्व शेतकर्यांना विनंती करण्यात येतें की, बीड जिल्हयातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेमार्फत व बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत घेतलेल्या कर्जाबाबत ▶▶पान ४ वर

# महावितरणच्या विरोधात बीडमध्ये रस्ता रोको

## हायवेवर दीड तास रास्तारोको, आ. विजयसिंह पंडित पोलिस अधीक्षकांना बोलले, कारवाईच्या आश्वासनानंतर रोको मागे

बीड, दि.१६ (लोकाशा न्युज) : महावितरणचा बेजबाबदारपणा आणि हायटेक कंपनीच्या निष्काळजीपणामुळे बालेपीरच्या गोरे वस्ती भागातील शेख आवेज शेख परवेज या १५ वर्षीय मुलाचा उघड्या डीपीला चिटकून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रविवारी सायंकाळी घडली होती. या प्रकरणात महावितरणचे संबंधित अधिकारी आणि हायटेक कंपनीविरूध्द तात्काळ गुन्हा दाखल करा अशी मागणी करत नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब यांच्यासह नगरसेवक व नागरीकांनी जिल्हा रूग्णालयाच्या



बाजूला असलेल्या हायवेवर सोमवारी तब्बल दीड तास रास्ता रोको केला. भर उन्हात शेख मुजीब यांच्यासह नगरसेवक आणि नागरीक रोडवर ठिय्या मांडून बसले होते. जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत उठणार नाहीत अशी आक्रमक भुमिका ▶▶पान ४ वर

### तावरेंसह आंदोलकांवर गुन्हा दाखल, डीवायएसपी समोर वेदना मांडल्या

घटनेनंतर नातेवाईकांच्या सोबत भागवत तावरे सुरवातीला पासून होते. पोलिसांनी आम्हाला सकाळी गुन्हा दाखल करू असा शब्द दिला आता चौकशी म्हणतात. भागवत तावरे यांनी नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब, नगरसेवक महेश धांडे, नगरसेवक रोहिल दादा, नगरसेवक अयुब भाई, गोरे यांना बोलावून घेत रस्त्यावर ठाण मांडले. भागवत तावरे यांनी भावनिक होऊन केलेले आवाहन काल सोशल मीडियात व्हायरल झाले.

# संयुक्त राष्ट्र संघाच्या पर्यावरण कार्यक्रमाच्या प्रमुखांनी घेतली ना.पंकजाताईंची भेट

## पर्यावरण संवर्धन ही मिशन मोडमधील कृती व्हावी

मुंबई, दि. १६ (लोकाशा न्यूज) : राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजाताई मुंडे यांची आज संयुक्त राष्ट्र संघ पर्यावरण कार्यक्रमाच्या वातावरणीय बदल विभागाचे संचालक तथा जागतिक प्रमुख मार्टिन क्रुसे यांनी भेट घेऊन विविध विषयांवर व धोरणात्मक बाबींवर चर्चा केली. राज्यातील वाढते शहरीकरण आणि बदलत्या हवामानाचा विचार करता, पर्यावरण संवर्धन ही आता केवळ चर्चा न राहता ती एक 'मिशन मोड' मधील कृती असायला हवी असे श्रीमती मुंडे



यांनी यावेळी बोलतांना नमूद केले. मुंबईतील शासकीय निवासस्थान रामटेक येथे संचालक मार्टिन क्रुसे यांच्यासोबत 'बीट द हिट' मोहिमेच्या तांत्रिक आणि धोरणात्मक ▶▶पान ४ वर

## तक्रार का दिली म्हणून कुटुंबावर दुसऱ्यांदा जीवघेणा हल्ला

बीड दि.१६ (लोकाशा न्यूज) : शहरातील सहयोग नगरमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या वादातून पिता-पुत्रावर भररस्त्यात प्राणघातक हल्ला करण्यात आला. पाच दिवसांपूर्वीही घरात घुसून मारहाण झाली होती. शहरातील सहयोग नगर परिसर आज सकाळी पुन्हा एकदा दहशतीच्या छायेत गेला. सदाशिव कोकाट आणि त्यांचा मुलगा हे नेहमीप्रमाणे आपल्या दुकानाकडे जात असताना, त्यांच्या एमआयडीसी भागातील घरासमोर दबा धरून बसलेल्या टोळक्याने भररस्त्यात त्यांच्यावर काठ्या लाठ्यांनी व शस्त्रांनी हल्ला चढवला. या बेदम मारहाणीत पिता-पुत्र गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, हल्लेखोरांनी अचानक रस्ता अडवून शिवीगाळ करत मारहाण सुरू केली. काही क्षणातच परिसरात गोंधळ उडाला. नागरिकांनी धाव घेईपर्यंत हल्लेखोरांनी दोघांना गंभीर जखमी करून पसार झाल्याचे सांगितले जाते. या घटनेपूर्वी अवघ्या पाच दिवसांपूर्वी याच टोळक्याने कोकाट कुटुंबाच्या घरात घुसून महिलांना मारहाण केल्याचा आरोप आहे. या टोळक्यात काही महिलांचाही समावेश असल्याचे सांगितले जाते. त्या वेळी छेडछाडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र आम्ही मारहाणीची तक्रार का दिली? या कारणावरून सूडबुद्धीने कालचा हल्ला झाल्याचा आरोप कोकाट कुटुंबीयांनी केला आहे.

# कामगारांच्या हक्कांवर जिल्हा कामगार अधिकाऱ्याचा हातोडा

बीड, दि.१६ (लोकाशा न्युज) :- जिल्हा कामगार अधिकारी सुधाकर कोणाळे यांचा कारभार सध्या कामगार आणि विद्यार्थ्यांसाठी मोठा डोकेदुखी ठरत आहे. कामगारांच्या मुलांसाठी शासनाने मंजूर केलेल्या शिष्यवृत्ती योजनांचे शेकडो अर्ज महिनोन्महिने प्रलंबित ठेवण्यात आले आहेत. कार्यालयात गेले की मला पहा आणि पानफुल व्हा अशा उर्मट भाषेत नागरिकांना उडवून लावले जात असल्याचा गंभीर आरोप कामगार संघटना व पालकांकडून होत आहे. मागील शैक्षणिक वर्ष संपत आले तरी विद्यार्थ्यांना स्कॉलरशिपचा लाभ मिळाला नसल्याने गरिब विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ केला जात आहे. वैद्यकीय ▶▶पान ४ वर

### शेकडो स्कॉलरशिप अर्ज प्रलंबित, गरीब विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ




### कोणाळेंचा कारभार लाभार्थ्यांसाठी डोकेदुखी जिल्हाधिकारी साहेब, लगाम घाला



### कोणाळे साहेब, तुम्ही छळ करायला की लाभ द्यायला?

कामगार संघटनांनी या प्रकरणाची चौकशी करून तात्काळ प्रलंबित अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे. कोणाळे साहेब, तुम्ही छळ करायला की लाभ द्यायला? असा थेट सवाल उपस्थित होत असून वरिष्ठांनी याची गंभीर दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## पोलिस भरतीच्या मैदानी चाचणीसाठी अनुउपस्थित उमेदवारांना पुन्हा संधी

बीड, दि. १६ (लोकाशा न्यूज) : पोलिस भरतीच्या मैदानी चाचणीसाठी वेगवेगळ्या कारणामुळे उपस्थित न राहिलेल्या उमेदवारांना पुन्हा एक संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळेच आता या उमेदवारांना येत्या १८ फेब्रुवारीला मैदानी चाचणी पुर्ण करता येणार आहे. याअनुषंगानेच बीड पोलिसांनी त्या उमेदवारांना हजर राहण्याचे आवाहन केले आहे.

**१८ फेब्रुवारीला मैदानी चाचणी करता येणार पुर्ण, उमेदवारांना हजर राहण्याचे बीड पोलिसांनी केले आवाहन**

बीड जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवर दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी पासून पोलीस शिपाई पदाची भरती प्रक्रिया पोलीस मुख्यालय बीड येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदरचे भरती प्रक्रिया दरम्यान आजारी असलेले उमेदवार, दुसऱ्या घटकात मैदानी चाचणी असलेले उमेदवार, एकाच दिवशी चालक व पोलीस शिपाई पदाची मैदानी चाचणी असलेले उमेदवार, राज्य राखीव पोलीस गटातील नक्षलगस्त बंदोबस्तसाठी तैनात असलेले ▶▶पान ४ वर

## कलाकेंद्रात गेले; परत येताना मित्राची दारू पाजून हत्या

**जुन्या वादाचा राग मनात धरून साळेगावच्या पाच मित्रांनी केली बेदम मारहाण**





बीड, दि. १६ (लोकाशा न्यूज): बीड जिल्ह्यातील सहा तरूण कळंब तालुक्यातील चोराखळीच्या लोक कला केंद्रावर गेले. मध्यरात्रीपर्यंत थांबून पुन्हा परत निघाल्यानंतर रस्त्यात दारू प्याले. त्यानंतर चालत्या वाहनातच एका मित्राची पाच जणांनी मिळून बेदम मारहाण करत हत्या केल्याची खळबळजनक घटना घडली आहे.

कळंब तालुक्यातील चोराखळी येथे घडलेल्या एका धक्कादायक घटनेने संपूर्ण जिल्हा पुन्हा एकदा हादरून गेला आहे. कला केंद्रातील कार्यक्रम पाहून परतत असताना जुन्या वादाचा राग मनात धरून पाच मित्रांनी मिळून आपल्याच एका सोबत्याचा निर्घृण खून केल्याची घटना उघडकीस आली आहे. ▶▶पान ४ वर






## उठावना



श्रीराम नंदलालजी सिकची

घनश्याम, उमेश सिकची के पिताजी सागर एवंम् केदार के दादाजी **श्रीराम नंदलालजी सिकची** (बेलुरावाला) इनका दुःखद निधन १५/०२/२०२६ रविवार को हुवा. जिनका उठावना मंगलवार दिनांक १७/०२/२०२६ को दोपहर. ४ बजे निजीनिवास , बनवारी बिल्डिंग, सारडा रेसिडेन्सी. बीड यहा पर होंगा.

–शोकाकुल–
बाळकिशन सुभाषचंद्र सिकची एवंम् सिकची परिवार, बेलूरावाला


## संपादकिय....

# फटकेबाजीचे तांडव

टी-२० विश्वचषकात भारत-पाकिस्तान सामना म्हणजे केवळ क्रिकेट नसते; तो इतिहास, भावना, राष्ट्राभिमान आणि खेळातील श्रेष्ठत्वाचा कस असतो. रविवारी महाशिवरात्रीच्या दिवशी खेळल्या गेलेल्या या महामुकाबल्यात भारतीय संघाने केवळ विजय मिळवला नाही, तर संपूर्ण क्रिकेटविश्वाला आपली ताकद, तयारी आणि मानसिक कणखरता दाखवून दिली. ६१ धावांनी मिळवलेला हा दणदणीत विजय आकड्यांपुरता मर्यादित नव्हता; तो भारताच्या टी-२० विश्वचषकातील सातत्यपूर्ण वर्चस्वाचा जाहीरनामा होता. किस्तानविरुद्धचा ८-१ असा विक्रम हा योगायोग नसून, नियोजन, कौशल्य आणि आत्मविश्वास यांचा परिपाक आहे.या विजयाचा केंद्रबिंदू ठरला ईशान किशन. संथ, फिरकीला मदत करणाऱ्या आर. प्रेमदासा स्टेडियमच्या खेळपट्टीवर त्याने साकारलेले फटकेबाजीचे तांडव म्हणजे आधुनिक टी-२० क्रिकेटचे सर्वोत्तम उदाहरण म्हणावे लागेल. ४० चेंडूंतील ७७ धावा ही केवळ वैयक्तिक कामगिरी नव्हती; ती सामन्याची दिशा ठरवणारी खेळी होती. किस्तानने सहा फिरकी गोलंदाज खेळवून भारतीय फलंदाजीला अडचणीत आणण्याचा डाव आखला होता, पण ईशानने त्या सर्व योजनांचा धुव्वा उडवला. पॉवरप्लेमधील त्याची आक्रमकता, मधल्या षटकांतील नियंत्रण आणि सीमारेषेवर नेमकी मारलेली फटकेबाजी पाकिस्तानसाठी असह्य ठरली.भारताला पहिल्याच षटकात अभिषेक शर्माच्या रूपाने धक्का बसला, पण त्या क्षणी संघ डगमगला नाही. याचे श्रेय केवळ फलंदाजांना नाही, तर संघाच्या मानसिकतेला जाते. दबावात कसे खेळायचे, हे या संघाने आत्मसात केले आहे. ईशान आणि तिलक वर्मा यांची भागीदारी ही त्याचे उत्तम उदाहरण होती. धावांचा वेग टिकवतानाच विकेट्स जपणे, हे त्यांनी साध्य केले. त्यानंतर सूर्यकुमार यादवची संयमी खेळी, शिवम दुबे आणि रिंकू सिंग यांचा शेवटचा झंझावात यामुळे भारत १७५ या आव्हानात्मक धावसंख्येपर्यंत पोहोचला. ही धावसंख्या पाहता ती १८०-१९० इतकी भासणारी होती, कारण खेळपट्टीवर फलंदाजी अजिबात सोपी नव्हती.पण हा सामना जिंकून देण्यात भारतीय गोलंदाजांचा वाटा तितकाच निर्णायक ठरला. लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानचा डाव सुरुवातीपासूनच ढासळलेला दिसला. पहिल्या चार फलंदाजांचा एकेरी धावसंख्येत झालेला पडदा हा सामन्याचा टर्निंग पॉइंट ठरला. भारतीय गोलंदाजांनी शिस्तबद्ध मारा करताना कुठेही सैलपणा दाखवला नाही. जसप्रीत बुमराह याची अचूक लाइन-लेंग्थ, हार्दिक पांड्या याचा आक्रमक वेग, अक्षर पटेल याची फिरकीतील शिस्त आणि वरुण चक्रवर्ती याच्या गूढ चेंडूंनी पाकिस्तानची कंबरडं मोडली. ११व्या षटकातच अर्धा संघ माघारी पाठवणे म्हणजे गोलंदाजीतील वर्चस्वाचे स्पष्ट चित्र होते.उस्मान खानने केलेली झुंजार खेळी ही पाकिस्तानसाठी एकमेव दिलासादायक बाब म्हणावी लागेल. पण एकाकी झुंज टी-२० सामन्यात पुरेशी ठरत नाही, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. भारतीय क्षेत्ररक्षणानेही सामन्यात मोलाची भूमिका बजावली. झेल, थ्रो, चपळता - प्रत्येक बाबतीत भारत पाकिस्तानपेक्षा एक पाऊल पुढे होता. आजच्या क्रिकेटमध्ये जिथे सीमारेषेवर वाचवलेल्या दोन-तीन धावा सामन्याचे पारडे फिरवू शकतात, तिथे भारताने ती अतिरिक्त मेहनत घेतली.या सामन्याचा आणखी एक पैलू म्हणजे मानसिक आणि राजनैतिक पातळीवरचा संदेश. भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव याने नो हँडशेक पॉलिसी' कायम ठेवत सामना संपल्यानंतरही हातमिळवणी टाळली. हा निर्णय क्रीडाभावनेवर प्रश्न निर्माण करणारा असू शकतो, पण त्यामागील संदर्भ, पार्श्वभूमी आणि संदेश दुर्लक्षित करता येणार नाहीत. खेळ आणि राजकारण वेगळे असावे, असे आपण म्हणतो; पण भारत-पाकिस्तान सामन्यांमध्ये ही सीमा नेहमीच धूसर राहिली आहे. सूर्यकुमारचा हा निर्णय काहींसाठी वादग्रस्त ठरू शकतो, तर काहींसाठी तो ठाम भूमिकेचे प्रतीक आहे.पाकिस्तानच्या डगआउटमध्ये सामना सुरू होण्यापूर्वी दिसलेला साप आणि त्याचा व्हायरल झालेला व्हिडीओ हे या सामन्याचे विचित्र पण प्रतीकात्मक क्षण ठरले. क्रिकेटमध्ये अंधश्रद्धेला फारसे स्थान नसले तरी अशा घटनांना प्रतीकात्मक अर्थ दिला जातो. प्रत्यक्ष मैदानावर मात्र भारताने कोणत्याही अंधश्रद्धेपेक्षा मेहनत, कौशल्य आणि रणनीतीवर विश्वास ठेवून विजय मिळवला.या सामन्याने टी-२० विश्वचषकातील भारताची दावेदारी अधिक मजबूत केली आहे. अ गटात अव्वल स्थान पटकावत सुपर-८ फेरीत प्रवेश करताना भारत केवळ गुणतालिकेत पुढे नाही, तर मानसिक आघाडीवरही आहे. पाकिस्तानविरुद्धचा हा विजय उर्वरित संघांसाठीही इशारा आहे. भारताकडे केवळ स्टार खेळाडूंची यादी नाही, तर परिस्थितीनुसार खेळ बदलू शकणारा संतुलित संघ आहे.ईशान किशनसारख्या खेळाडूची ही खेळी भारतीय संघाच्या बेंच स्ट्रेंथचे महत्त्व अधोरेखित करते. कधी संघाबाहेर, कधी संघात - अशा चढउतारांनंतरही मिळालेल्या संधीचे सोने कसे करायचे, याचा हा आदर्श नमुना आहे. ही खेळी भविष्यातील सामन्यांसाठी आत्मविश्वास देणारी ठरेल, इतकेच नव्हे तर संघातील स्पर्धाही अधिक तीव्र करेल.पाकिस्तानसाठी हा पराभव आत्मपरीक्षणाची गरज अधोरेखित करणारा आहे. केवळ गोलंदाजीच्या वैविध्यावर अवलंबून राहणे पुरेसे नाही, तर फलंदाजीतील सातत्य, क्षेत्ररक्षणातील तत्परता आणि दबाव झेलण्याची मानसिकता विकसित करणे आवश्यक आहे. अन्यथा भारतासारख्या संघाविरुद्ध अशा मोठ्या सामन्यांत पराभवाची पुनरावृत्ती होत राहील.शेवटी, हा सामना क्रिकेटप्रेमींसाठी एक उत्सव ठरला. महाशिवरात्रीच्या दिवशी तांडव' हा शब्द ईशान किशनच्या टकेबाजीसाठी वापरला गेला, ते काहीसे योगायोगाने, तर काहीसे प्रतीकात्मकच. हा विजय केवळ एका सामन्यापुरता मर्यादित नाही; तो भारतीय क्रिकेटच्या सध्याच्या दिशेचा, आत्मविश्वासाचा आणि भविष्यातील महत्त्वाकांक्षांचा आरसा आहे. सुपर-८ मध्ये प्रवेश करताना भारताने संपूर्ण जगाला एकच संदेश दिला आहे, आम्ही तयार आहोत, आणि आव्हान कोणाचेही असो.

# क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे

आज १७ फेब्रुवारी, स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांचा स्मृतिदिन. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकरांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे. वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे ( राऊत ) तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रागाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८१७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली मात्र या



युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली. भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शाहिद झाले त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करतना मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यतिल रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १८३९ साली इंग्रजांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले. छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली. याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले. मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनय्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजीचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतीकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगमपूरच्या परिसरात एका झोपडीवजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली आणि एका महान क्रांतीपर्वाचा शेवट झाला. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्वासापर्यंत लढले आणि आपल्या सारखेच हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले म्हणूनच त्यांना क्रांतिकरांचे गुरू असे म्हणतात. आज त्यांचा स्मृतिदिन मात्र आजही त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला नाही हे आपले दुर्दैव. अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितकेच जबाबदार आहेत त्यांनी वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहचवले नाही. वस्ताद लहुजी साळवे यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**

# गाडीला कट मारल्यावरून जातीवाचक शिवीगाळ

## पाच जणांवर अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

माजलगाव; दि. १६ (लोकाशा न्यूज) : शहरातील मुख्य रस्त्यावर असलेल्या चव्हाण हॉस्पिटल समोर स्कुटीला कट का मारला म्हणुन रविवारी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास मारहाण केल्याप्रकरणी पाच जनाविरुद्ध ट्रॉसिटी क्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून यातील पाचही आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले.

रविवारी रात्री शुभम रूपचंद कांबळे हा युवक स्कुटी (एम.एच.२३ बीके ५१९३ ) हा मुख्य रस्त्यावरून जात असताना चव्हाण हॉस्पिटलसमोर रवि कु-हाडे याने कट मारला. याबाबत शुभम याने कटका मारला अशी विचारणा केली असता रवि कु-हाडे याने शुभम यास जातीवाचक शिवीगाळ करत स्कुटीला पाठीमागून धडक दिली व शुभम यास खाली पाडून रवि कु-हाडे व लक्ष्मण शिंदे यांनी गैर कायद्याची मंडळी जमवुन शुभमला मारहाण केली. यावेळी शुभम या ठिकाणाहून पळुन जात असताना विशाल चव्हाण , विलास चव्हाण व राहुल चव्हाण यांनी त्यास पकडून ठेवले व रवि कु-हाडे याने यावेळी त्याचा गळा दाबून दिवे मारण्याचा प्रयत्न केला. यावेळी लक्ष्मण शिंदे याने शुभमला अवघड जागेवर , छाती व पोटात लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी शुभम याचे वडील रूपचंद कांबळे हे या ठिकाणी आले असता त्यांना रवि कु-हाडे व विलास चव्हाण याने जातिवाचक शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी शुभम रूपचंद कांबळे व रूपचंद साधोजी कांबळे यांच्या फिर्यादीवरून रवि मारोती कु-हाडे , विशाल नागोराव चव्हाण , विलास नागोराव चव्हाण , राहुल नागोराव चव्हाण व लक्ष्मण भगवान शिंदे सर्व रा. वडारवाडा माजलगाव यांच्याविरुद्ध ट्रॉसिटी क्ट व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पाचही आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपअधीक्षक अनिल कटके व सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद मुंडे हे करत आहेत.

# किरकोळ वादातून तरुणाला अमानुष मारहाण

माजलगाव, दि.१६ (लोकाशा न्यूज) : शहरातील मुख्य रस्त्यावर चव्हाण हॉस्पिटलसमोर रविवारी रात्री एक भीषण घटना घडली. गाडीला कट मारल्याचा जाब विचारल्याच्या कारणावरून शुभम रूपचंद कांबळे या तरुणाला पाच जणांनी मिळून बेदम मारहाण केली. या प्रकरणी जातीवाचक शिवीगाळ आणि जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपाखाली माजलगाव शहर पोलिसांनी पाचही संशयितांना ताब्यात घेतले आहे.

शुभम कांबळे हा आपली स्कुटी घेऊन मुख्य रस्त्यावरून जात असताना रवी कुऱ्हाडे याने त्याच्या गाडीला कट मारला. शुभमने 'कट का मारला?' अशी विचारणा केली असता, रवीने त्याला जातीवाचक शिवीगाळ करत गाडीला पाठीमागून धडक दिली. त्यानंतर रवी कुऱ्हाडे आणि लक्ष्मण शिंदे यांनी इतरांना जमवून शुभमला खाली पाडून मारहाण करण्यास सुरुवात केली. शुभमने जिवाच्या भीतीने पळून जाण्याचा प्रयत्न केला असता, विशाल, विलास आणि राहुल चव्हाण यांनी त्याला पकडून ठेवले. यावेळी रवी कुऱ्हाडे याने शुभमचा गळा दाबून त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केला, तर लक्ष्मण शिंदे याने त्याला अवघड जागेवर आणि छातीवर लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. शुभमचे वडील रूपचंद कांबळे हे मुलाला वाचवण्यासाठी धावले असता, त्यांनाही जातीवाचक शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. या प्रकरणी शुभम आणि त्याचे वडील रूपचंद कांबळे यांच्या फिर्यादीवरून रवी कुऱ्हाडे, विशाल चव्हाण, विलास चव्हाण, राहुल चव्हाण आणि लक्ष्मण शिंदे (सर्व रा. वडारवाडा) यांच्याविरुद्ध अॅट्रॉसिटी अॅक्टसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपअधीक्षक अनिल कटके आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद मुंडे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## पान १ वरून

### अधिवेशनात होणार

महायुती सरकारने निवडणूकीच्या काळात शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते, आता आश्वासन दिल्याप्रमाणे सरकारने कर्जमाफीच्या हालचाली सुरु केल्या आहेत. डिसेंबर पासूनच मध्यवर्ती बँक, सेवा सहकारी सोसायटीच्या सचिवांनी आपापल्या थकीत आणि चालू खातेदारांची कागदपत्रे जमवून माहिती जमवली आहे. सदरील माहिती उपनिबंधक कार्यालयाकडून पोर्टलवर अपलोड करुन सरकारला कळवली जात आहे. राज्यातील किती शेतकरी व त्यांची थकीत आणि चालू कर्ज रक्कम याचा ताळेबंद करुन अर्थसंकल्पीय अधिवेशनापुर्वी सरकारकडे सादर केले जाणार आहे. डिसेंबर पासुन कागदपत्रे जमवण्याची प्रक्रिया सुरु होती. दि. १५ फेब्रुवारी कर्जमाफी संदर्भात कागदपत्रे जमा करण्याची शेवटची तारीख होती. मध्यवर्ती बँका आणि सेवा सोसायटीचे कर्ज असणाऱ्या अनेक शेतकऱ्यांनी कागदपत्रे जमा केली नाहीत. अशा शेतकऱ्यांना कर्जमाफी पासुन वंचित रहावे लागणार आहे. संबंधित विभागाने वेळो वेळी आवाहन केले तरीही काही शेतकऱ्यांनी कागदपत्रे जमा केली नाहीत. त्यामुळे आता आणखी दोन दिवस ही प्रक्रिया चालणार आहे. तशी मुदत वाढविण्यात आली आहे. तर दि. २३ फेब्रुवारी पासुन सुरु होत असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातच कर्जमाफीचे बजेट सरकारला तरतूद करावे लागणार आहे. या साठीच अर्थसंकल्पीय अधिवेशनापुर्वी शेतकऱ्यांची कागदपत्रे संबंधित विभागाकडून जमा करुन घेण्यात येत आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे यामध्ये बीड डीसीसीची तब्बल साडे चारशे कोटींची कर्जमाफी होण्याची शक्यता आहे. यातून जिल्ह्यातील साठ हजार शेतकरी कर्जमुक्त होणार आहे. यामुळे पुन्हा जिल्हा बँकेला चांगले दिवस येणार असून नव्याने कर्ज वाटपालाही गती मिळणार आहे.

### संयुक्त राष्ट्र संघाच्या

अंमलबजावणीवर श्रीमती मुंडे यांनी सखोल चर्चा केली. यावेळी संयुक्त राष्ट्र संघ पर्यावरण कार्यक्रमाच्या कार्यक्रम व्यवस्थापन अधिकारी बेंजामिन हिकमन, कार्यक्रम व्यवस्थापन अधिकारी मनोजकुमार एम, राज्य वातावरणीय बदल कृती कक्षाचे संचालक अभिजीत घोरपडे, वरिष्ठ सल्लागार प्राची मर्चंट यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते. जागतिक स्तरावरील अनुभवांची जोड देऊन महाराष्ट्रात उष्णतेच्या लाटेवर मात करण्यासाठी एक भक्कम आराखडा तयार करण्याबाबत या दोन्ही मान्यवरांमध्ये यावेळी सकारात्मक चर्चा झाली. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर शीतकरण ही चैनीची नव्हे तर विकासाची मूलभूत गरज असल्याचे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व हवामान बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी केले. शाश्वत शीतकरण सर्वांसाठी परवडणारे, ऊर्जा कार्यक्षम आणि शहरी पुनर्विकास व गृहनिर्माण आराखड्यात समाविष्ट असणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. उत्सर्जन वाढवणाऱ्या पारंपरिक विकासाऐवजी जिल्हास्तरीय कूलिंग प्रणाली, निष्क्रिय (पॅसिव्ह) डिझाइन पद्धती आणि ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञानाला प्राधान्य दिले जाणार असल्याचे मंत्री मुंडे यांनी सांगितले. उष्णतेच्या वाढत्या जागतिक संकटाकडे लक्ष वेधताना संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमाचे हवामान बदल संचालक मार्टिन क्रुसे यांनीही मोठ्या प्रमाणावर राबवता येतील अशा व्यवहार्य उपाययोजनांची गरज अधोरेखित केली. महाराष्ट्र शासनाचा ' बी कूल' प्रकल्प शहर, परिसर आणि इमारत पातळीवरील शीतकरण उपायांना चालना देणार असून त्याला तांत्रिक कौशल्य आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याची जोड मिळणार आहे. यासोबतच वैज्ञानिक नदी पुनरुज्जीवन, उपग्रहाधारित मिथेन निरीक्षण, कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती, दुध व कृषी क्षेत्रासाठी अक्षय ऊर्जेवर आधारित कोल्ड चेन आणि हवामान-संवेदनशील शहरी प्रशासनावरही भर दिला जात असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. सध्या चार शहरांमध्ये 'क्लायमेट अॅक्शन सेल' कार्यान्वित झाले असून आणखी सहा शहरांमध्ये प्रक्रिया सुरू आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७' या दृष्टीकोनातून पर्यावरणीय संरक्षण आर्थिक विकासाला बळ देणारे ठरेल, असा विश्वास मंत्री श्रीमती मुंडे यांनी व्यक्त केला.

### कामगारांच्या हक्कांवर

मदत, विवाह सहाय्य यांसारख्या लाभाचे हजारो अर्ज निकाली काढले जात नसल्याने कामगारांच्या हक्कांवर हातोडा घातला जात असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. दरम्यान, या सर्व मनमानी कारभारात जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालून कामगारांना न्याय द्यावा, अशी मागणी होत आहे.

कामगार कल्याण मंडळामार्फत दिल्या जाणाऱ्या शिक्षणविषयक स्कॉलरशिप, वैद्यकीय मदत, विवाह सहाय्य यांसारख्या योजनांमुळे गरीब कामगारांच्या कुटुंबांना मोठा आधार मिळतो. मात्र, बीड जिल्ह्यात या लाभांची वाट पाहत अनेक विद्यार्थी शिक्षण अर्धवट सोडण्याच्या मार्गावर आहेत. अर्ज ऑनलाईन सादर करूनही त्यावर महिनोमहिने कोणतीही कार्यवाही होत नसल्याने पालकांची पायपीट वाढली आहे. सन २०२६ चा फेब्रुवारी महिना अर्धा संपला तरी अद्याप सन २०२५ मधील

बीड तालुक्यातील मे महिन्यातील ऑनलाईन आलेले अर्ज निकाली काढण्याचे काम अत्यंत धिम्या गतीने सुरू आहे. साधारण मे महिन्यांपासून आजपर्यंत सुमारे ९ महिन्याचे विविध योजनेचे अर्ज अद्यापही प्रलंबित आहेत. विद्यार्थ्यांचे मागील शैक्षणिक वर्ष संपत आले तरी अद्याप त्यांना स्कॉलरशिपचा लाभ मिळाला नाही. त्यामुळे लाभार्थी, पालक कार्यालयात हेलपाटे मारत आहेत. कार्यालयात विचारणा केली असता माझ्याकडे इतरही पदभार आहेत, वेळ नाही अशी उत्तरे मिळत असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे उंटावरून शेळ्या' असा कारभार सुरू असल्याचा आरोप होत आहे. जबाबदारी झटकून कामगारांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांमुळे शासनाच्या कल्याणकारी योजना कागदावरच अडकल्या आहेत.

### सुनेत्रा पवार राष्ट्रवादीच्या

आलं, अशी देखील माहिती सूत्रांनी दिली आहे. दरम्यान आता फक्त औपचारिकता बाकी असून, येत्या २६ तारखेला राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय कार्यकारीणीची अध्यक्षपदाच्या निवडीसाठी बैठक पार पडणार आहे, या बैठकीमध्ये सुनेत्रा पवार यांच्या नावाची घोषणा होईल, अशी माहिती समोर येत आहे. २८ जानेवारी रोजी अजित पवार यांच्या विमानाचा भीषण अपघात झाला, या अपघातामध्ये त्यांचं निधन झालं. अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली. अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादीचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष कोण असणार असा प्रश्न उपस्थित केला जात होता. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार अखेरे राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून सुनेत्रा पवार यांच्या नावाची घोषणा झाली आहे. आज देवगिरी बंगल्यावर आमदाराची महत्त्वाची बैठक पार पडली, या बैठकीमध्ये प्रफुल पटेल यांनी राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून सुनेत्रा पवार यांच्या नावाची घोषणा केली आहे. प्रफुल पटेल यांच्याकडून नावाची घोषणा झाल्यानंतर सर्व आमदारांकडून हात वर करून सुनेत्रा पवार यांच्या नावाला समर्थन देण्यात आलं. आता येत्या २६ फेब्रुवारी रोजी पक्षाच्या कार्यकारीणीची बैठक होणार आहे, या बैठकीत याबाबत घोषणा होणार आहे.

## पान १ वरून

### महावितरणच्या निष्काळजीपणामुळेच

यावेळी आंदोलकांनी घेतली होती. अखेर आ.विजयसिंह पंडित यांनी पोलीस अधिक्षकांशी मोबाईलवरून चर्चा करत नंतर आंदोलकांशीही मोबाईलवरूनच संवाद साधून या प्रकरणात तातडीने कारवाई करू असे आश्वासन पोलीस अधिक्षकांनी दिल्याचे सांगितले. त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

बीड शहरातील बालेपीर भागातील गोरे वस्ती येथील शेख आवेज शेख परवेज या १५ वर्षीय मुलाच्या मृत्यूस कारणीभूत असलेले महावितरण संबंधित अधिकारी आणि त्याची जबाबदारी असलेल्या हायटेक कंपनीवर गुन्हा दाखल करावा अशी मागणी मयत मुलाच्या नातेवाईकांनी केली होती. आज सकाळी नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब, राष्ट्रवादी काँग्रेसचे माध्यम प्रमुख भागवत तावरे, नगरसेवक महेश धांडे, नगरसेवक रोहिल दादा, नगरसेवक अय्युब खान, नगरसेवक मकसुद खान, नगरसेवक खय्युम इनामदार, अॅड.सय्यद खाजा, मोहम्मद सादेक मेंबर, शाहेद पटेल यांच्यासह नागरीकांनी आज सकाळी जिल्हा रूग्णालयाच्या परिसरातील शवविच्छेदन गृहासमोर हायवेवर रास्ता रोको आंदोलन सुरू केले. तब्बल दीड तास सर्व आंदोलक भर उन्हात रस्त्यावर ठिय्या मांडून बसले होते. घटनास्थळी पोलीस उपअधिक्षक पुजा पवार, स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.शिवाजी बंटेवाड, ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव आदिंनी भेट दिली. आ.विजयसिंह पंडित यांनीही या प्रकरणाची दखल घेत तातडीने पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांच्याशी मोबाईलवरून चर्चा करून त्यांना घटनेची माहिती सांगितली. पोलीस अधिक्षकांनी या प्रकरणात तातडीने चौकशी करून कारवाईचे आश्वासन दिल्यानंतर हा रस्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आले.

**२० तासानंतर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतला**

बीड शहरातील बालेपीर भागातील गोरे वस्ती येथील १५ वर्षीय शेख आवेज शेख परवेज याचा मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना घडल्यानंतर या भागातील नागरीकांसह नातेवाईकांनी आक्रमक भुमिका घेतली होती. उघड्या डीपीला चिटकल्याने शॉक बसून त्याचा मृत्यू झाल्याने याला महावितरणचा बेजबाबदारपणा कारणीभूत असल्याचा आरोप नातेवाईकांनी केला होता. मात्र आज सकाळपर्यंत महावितरणने या प्रकरणाची कसलीच दखल घेतली नव्हती. त्यामुळे शेवटी लोकप्रतिनिधींना आणि नागरीकांना रस्त्यावर उतरावे लागले, आंदोलन करावे लागेल. त्यानंतर पोलीस प्रशासनाने चौकशी करून कारवाईचे आश्वासन दिल्याने आज दुपारी १ वाजण्याच्या सुमारास मुलाचा मृतदेह नातेवाईकांनी ताब्यात घेतला.

**चौकशी करून कारवाई करणार- पोलीस अधिक्षक नवनीत काँवत**

आ.विजयसिंह पंडित यांनी पोलीस अधिक्षकांशी मोबाईलवरून चर्चा करून घटनेची माहिती दिली. या प्रकरणी लोकांच्या भावना त्यांच्या समोर मांडल्या. त्याची दखल घेत पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी या सर्व घटनेची चौकशी करून कारवाई करणार असल्याचे आश्वासन दिले. त्यानंतर आ.विजयसिंह पंडित यांनी मोबाईलवरून आंदोलकांशी संवाद साधून पोलीस अधिक्षकांशी झालेल्या चर्चेची आणि त्यांनी दिलेल्या कारवाईच्या आश्वासनाची माहिती दिली. त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

### पोलिस भरतीच्या मैदानी

उमेदवार, एकाच दिवशी आर्मी भरती व पोलीस भरती असलेले उमेदवार, मैदाणी चाचणीच्या वेळी वैद्यकीय कारणास्तव पुर्ण मैदानी चाचणी पूर्ण करु न शकलेले उमेदवारांना अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांच्याकडील मैदानी चाचणीसाठी उमेदवारांना प्रवेश देणे बाबतचे परिपत्रकाचे अवलोकन करुन वरील कारणास्तव पुर्ण मैदानी चाचणी पूर्ण करु न शकलेले उमेदवारांना मैदानी चाचणी पूर्ण करण्यासाठी एक संधी देण्याच्या अनुषंगाने वरील कारणास्तव पुर्ण मैदानी चाचणी पूर्ण न करु शकलेले उमेदवारांनी दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ०७.०० वा. कवायत मैदान, नगर रोड, पोलीस मुख्यालय बीड येथे मैदानी चाचणीसाठी हजर राहावे, असे आवाहन बीड पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## पान १ वरून

### शेतकऱ्यांनो, दोन

शेतकऱ्यांचे केवायसी करणे आवश्यक असल्याने तसेच जे शेतकरी मयत झाले असतील त्यांच्या वारसांनी विविध सेवा' सहकारी संस्था व बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेत वारसांची नावे देऊन सर्वांनी त्यांचे आधार कार्ड संबंधीत गटसचिव व बँकेचे शाखाधिकारी यांचेकडे जमा करावेत, असे आवाहन बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., बीड तर्फे करण्यांत आले होते परंतु बीड जिल्हयातील शेतकऱ्यांनी त्यांचे आधारकार्ड बीड जिल्हा बँकेच्या शाखेत तसेच सेवा सहकारी संस्थेत जमा केल्याचे दिसून येत नाही. शासनाने अजुन दि. १८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत योजनेस मुदतवाढ दिलेली आहे तरी दि. १८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत थकबाकीदार शेतकऱ्यांनी त्यांचे आधारकार्ड बीड जिल्हा बँकेच्या शाखेत किंवा सेवा. सहकारी संस्थेच्या गटसचिव यांचेकडे जमा करावेत, दि. १८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत आधारकार्ड न दिल्यास या योजनेपासून वंचीत राहील्यास संस्थेचे चेअरमन, संचालक मंडळ वं संबंधीत थकबाकीदार सभासद हे जबाबदार राहतील याची बीड जिल्हयातील सर्व थकबाकीदार शेतकऱ्यांनी नोंद घ्यावी व आपले आधार कार्ड दोन दिवसात म्हणजे दि. १८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत बीड जिल्हा बँकेत किंवा सेवा सहकारी सोसायटीकडे द्यावेत, असे आवाहन डीसीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी शरद ठोंबरे यांनी केले आहे.

### कलाकेंद्रात गेले;

या घटनेत केज तालुक्यातील साळेगाव येथील सतीश भागवत मुंडे (वय ३७) या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. याप्रकरणी येरमाळा पोलिसांनी पाच संशयित आरोपींना अटक केली असून परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.कला केंद्रातील कार्यक्रमानंतर रस्त्याच हत्या मिळालेल्या माहितीनुसार, मयत सतीश मुंडे हा १२ ब्रुवारी रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास आपल्या पाच मित्रांसह चोराखळी येथील महाकाली कला केंद्रात नृत्य कार्यक्रम पाहण्यासाठी गेला होता. मध्यरात्री एक वाजेपर्यंत कार्यक्रम पाहिल्यानंतर सर्वजण साळेगावकडे परतत होते. याच दरम्यान, जुन्या वादाचा वचपा काढण्याच्या उद्देशाने संशयित आरोपींनी कट रचल्याचे पोलिस तपासात समोर येत आहे. फिर्यादीनुसार, सतीशला आधी दारू पाजण्यात आली आणि त्यानंतर परतीच्या वाटेत त्याच्यावर अमानुष हल्ला करण्यात आला.

आरोपींनी चालत्या वाहनात किंवा रस्त्यात सतीशला लाथाबुक्क्यांनी पोटावर व छातीवर जबर मारहाण केली. ही मारहाण इतकी भीषण होती की सतीशचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच मयताचे वडील भागवत बळीराम मुंडे यांनी १५ ब्रुवारी रोजी रात्री येरमाळा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी तातडीने गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. या प्रकरणात शेख अजमोद्दीन ऊफर् मुन्ना शेख जिलानी, शेख शकील रौफ, संजय जनार्धन गिते, मधुकर गोरोबा इंगळे आणि दत्ता बाबासाहेब तोंडे (सर्व रा. साळेगाव, ता. केज, जि. बीड) या पाच संशयितांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. घटनेचा तपास पोलिस उपनिरीक्षक स्वप्निल भोजगुडे करत आहेत.

दरम्यान, चोराखळी येथील कला केंद्रांमध्ये होणारी गर्दी आणि त्यातून उद्भवणारे वाद यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याने अशा केंद्रांवर पोलिसांचा कडक वचक असावा, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. एका तरुणाचा जीव गेल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, या घटनेने मैत्रीच्या नात्यालाच काळीमा फासला आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक **विजयराज हेमराज बंब** यांनी जैन ऑफसेट प्रिन्टेक्स, बंब इस्टेट, मोंढा रोड, बीड येथे छापून लोकाशा भवन, बंब इस्टेट, जैन पतसंस्थेजवळ, बीड ४३१ १२२, लोकाशा कार्यालय, पावडे कॉम्प्लेक्स, शिवाजीनगर, नांदेड, लोकाशा कार्यालय, नगर परिषद कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर, लोकाशा कार्यालय, शॉप नं. २०९, इमारत नं. २, पहिला मजला, अपना बाजार, एसएफएस कंपाऊंड, जालना रोड, औरंगाबाद येथून एकाच वेळी प्रकाशित केले. **संपादक : विजयराज हेमराज बंब** दूरध्वनी क्र. : ९२२५९३९४९१ ई-मेल : रक्षहरश्रेज्ञरिहरऽसारळश्र.लो, ठछख छे. चअक्कअठ/क२००७/२४७१७
* या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, अंकात प्रसिद्ध झालेल्या मजकुराची संपूर्ण जबाबदारी **निवासी संपादक उत्तम हजारे** यांच्यावर राहील.

Daily lokasha Owner, Printer, Publisher and Edtor **Vijayraj Hemraj Bumb** has Printed at Jain Offset Printex, Bumb Estate, Mondha Road Beed, near Jain Patsanstha, Beed 431122 Lokasha Office, Pawde Complex Shivaji nagar Nanded, Nagar Parishad Gandhi chowk Latur, Lokasha Office, Shop N. 209, Building No 2 first Floor, Apna Bazar, SFS compund Jalna Road, Aurangabad published same time. Editor **Vijayraj Hemraj Bumb** Phone No 9225939491 E-Mail- majhalokasha@gmail.com, RNI No. MAHMAR/H$2007/24717 * The editors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue.

# नगरसेवक उतरले रस्त्यावर, पाईपलाईन दुरूस्त करत पाणी टंचाईवर मात

पाटोदा,दि.१६ (लोकाशा न्यूज) : पाटोदा शहरात मागील काही दिवसांपासून वाढत्या पाणीटंचाईमुळे नागरिकांचे हाल वाढले असून, दैनंदिन जीवनावर त्याचा गंभीर परिणाम होत आहे. अनेक भागांत पाणीपुरवठा अनियमित होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात होती. या पार्श्वभूमीवर नगरसेवक सय्यद आबुशेठ यांनी पुढाकार घेत थेट प्रत्यक्ष मैदानात उतरून पाईपलाईन दुरुस्तीची व्यापक मोहीम हाती घेतली आहे. नगरपंचायत कर्मचाऱ्यांसह समन्वय साधत त्यांनी शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत.

**गळती व तांत्रिक बिघाडांमुळे पाणीपुरवठ्यावर परिणाम**

शहरातील विविध वसाहतींमध्ये जुनी व जीर्ण झालेली पाईपलाईन, ठिकठिकाणी होणारी गळती तसेच तांत्रिक बिघाडांमुळे पाणीपुरवठा मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाला होता. नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येत असल्याने परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत चालली होती. पाणी कमी दाबाने येणे, काही भागांत पूर्णतः पाणी न मिळणे, तर काही ठिकाणी पाण्याची नासाडी होणे अशा समस्या समोर येत होत्या. या सर्व बाबींचा सखोल आढावा घेत नगरसेवक सय्यद आबुशेठ यांनी तातडीने उपाययोजना राबविण्याचा निर्णय घेतला.

**नगरसेवकांचा थेट सहभाग, कामाला गती**

केवळ सूचना देऊन थांबण्याऐवजी नगरसेवक सय्यद आबुशेठ यांनी स्वतः दुरुस्तीच्या ठिकाणी उपस्थित राहून कामाची पाहणी केली. नगरपंचायत कर्मचाऱ्यांसोबत समन्वय साधत त्यांनी प्रत्यक्ष कामाला गती दिली. आवश्यक यंत्रसामग्री, पाइप, वाल्व्ह व अन्य साहित्य तात्काळ उपलब्ध करून देण्यात आले. सध्या शहरातील विविध भागांत युद्धपातळीवर पाईपलाईन दुरूस्तीचे काम सुरू असून, गळती थांबवून पाणीपुरवठा पूर्ववत करण्यावर भर दिला जात आहे. या प्रयत्नांमुळे लवकरच नागरिकांना दिलासा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

**दीर्घकालीन उपाययोजनांचा आराखडा**

दरम्यान, पाणी समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी सुरेश आण्णा यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष आराखडा तयार करण्यात येणार असल्याची माहिती नगरसेवक सय्यद आबुशेठ यांनी दिली. भविष्यात वाढती लोकसंख्या आणि पाण्याची मागणी लक्षात घेऊन नवीन पाईपलाईन, साठवण क्षमता वाढवणे तसेच पाण्याच्या अपव्ययावर नियंत्रण ठेवण्यासाठी ठोस आणि दीर्घकालीन उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. नागरिकांना पुन्हा पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी नगरपंचायत प्रशासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केल.



## गेवराईच्या चिंतेश्वर मंदिरात मोफत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

गेवराई,दि.१६ (लोकाशा न्यूज):- महाशिवरात्री निमित्ताने शहरातील ग्राम दैवत असलेल्या भगवान चिंतेश्वर मंदिरामध्ये पहाटे पासुन दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती तर हर हर महादेव जयघोष करत गेवराईत महाशिवरात्री निमित्त शिवालये गजबजली होती. तर चिंतेश्वर मंदिरात मोफत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न झाले.




महाशिवरात्री उत्सवाच्या अनुषंगाने देशभरात शिव मंदिर गजबजली होती . तर गेवराई शहराचे ग्रामदैवत असलेल्या भगवान चिंतेश्वर मंदिरामध्ये पहाटे पासुन दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती प्रभु रामचंद्राच्या पावन हस्ते स्थापन झालेले चिंतेश्वर मंदिर आहे. याचा उल्लेख प्राचीन पुराणांमध्ये केला आहे.

जो भाविक चिंतेश्वर भगवंताचे दर्शन करतो तो चिंता मुक्त होतो अशी अख्याकीका आहे. संस्थानच्या वतीने गुरुवर्य ह.भ.प. दिलीप महाराज घोगे यांनी भाविकांसाठी शिवरात्री उत्सवाच्या काळात रोज शिवपुराण, किर्तन आदी कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. तर शहरातील विठुमाऊली रुग्णालयाच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. डॉ.गवारे यांनी मोफत रुग्णांची आरोग्य तपासणी केली आहे.

## ज्ञानेश्वरी जीवनमार्ग दर्शविणारा दीपस्तंभ–ह.भ.प.लक्ष्मण खरात

गेवराई,दि.१६ (लोकाशा न्यूज):- वारकरी संप्रदायात हरिपाठ आणि ज्ञानेश्वरीला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. संत परंपरेतील या अमूल्य ग्रंथांचे अभंग आणि ओव्या जर एखाद्या भाविकाच्या तोंडून सहजपणे, वारंवार पाठ होत असतील तर ते केवळ स्मरणशक्तीचे लक्षण नसून ती ग्रंथकृपेची अनुभूती आहे . तसेच संत ज्ञानेश्वर महाराजांनी रचलेली ज्ञानेश्वरी ही जीवनमार्ग दर्शविणारा दीपस्तंभ आहे असे प्रतिपादन ह.भ.प. लक्ष्मण महाराज खरात यांनी केले.



गेवराई तालुक्यातील धोंडराई येथे महाशिवरात्री निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात शिवपुराण कथे प्रसंगी शिवपुराण कथा प्रवक्ते लक्ष्मण महाराज खरात बोलत होते. यावेळी शिवपुराण कथेमुळे गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. पुढे बोलताना जाधव म्हणाले की, हरिपाठ हा नामस्मरणाचा अखंड झरा आहे. दररोज हरिनाम घेत असताना अभंग आपोआप ओठांवर येणे म्हणजे अंतःकरणात भक्तीची ज्योत प्रज्वलित झाल्याचे प्रतीक होय. त्याचप्रमाणे ज्ञानेश्वरी मधील ओव्या जर पुन्हा पुन्हा स्मरणात येत असतील, तर ती संतांची आणि ग्रंथांची विशेष कृपा समजली जाते.ग्रंथ समजणे म्हणजे त्यालाही आपले भाग्य लाभते. ग्रंथकृपा झाली की हरिपाठाचे अभंग आणि ज्ञानेश्वरीच्या ओव्या पुन्हा पुन्हा पाठ होतात भक्ताच्या जीवनात आध्यात्मिक जागृतीचे आणि ग्रंथकृपेचे स्पष्ट लक्षण असल्याची भावना भाविकांत दृढ होत आहे असेही शेवटी बोलताना त्यांनी सांगितले. यावेळी कथा श्रवणास महिला व पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## देश सेवा करून आलेले जवान पांडुरंग परजणे यांचा खालापूरी ग्रामस्थांनी केला जंगी सत्कार

खालापूरी,दि.१६ (लोकाशा न्यूज) : शिरूर कासार तालुक्यातील खालापुरी येथील जवान पांडुरंग सुभाष राव परजणे यांनी २४ वर्ष भारतीय सैन्य दलात देशातील विविध भागात यशस्वी सेवा केली काल १४ फेब्रुवारी २०२६ रोजी ते सेवानिवृत्त झाले सेवानिवृत्तीनंतर त्यांचा सपत्नीक रक्षक ग्रुप व खालापुरी ग्रामस्थांनी काल शनिवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास गावातून मिरवणूक काढून जंगी स्वागत केले.



पांडुरंग मंदाबाई सुभाषराव परजणे हे २००२ मध्ये भारतीय सैन्य दलात दाखल झाले होते उत्तर प्रदेशातील लखनऊ या ठिकाणी यांची ट्रेनिंग पार पडली त्यानंतर त्यांनी हरिद्वार, लेह, लदाख ,राजस्थान, पश्चिम बंगाल ,पंजाब, चंदिगड ,आणि पुणे या ठिकाणी कमांड हॉस्पिटलमध्ये चांगल्या प्रकारे सेवा केली काल १४ फेब्रुवारी रोजी ते सेवानिवृत्त झाले रक्षक ग्रुप व ग्रामस्थांनी ते गावाकडे येणार असल्याची माहिती मिळतात त्यांचा गावातून वाजत गाजत जंगी सपत्नीक सत्कार केला याप्रसंगी परिसरातील अनेक जवान व ग्रामस्थांनी त्यांच्याविषयी असलेले अनुभव व आतापर्यंत केलेले कार्य सांगितले यावेळी सत्काराला उत्तर देताना पांडुरंग परजणे म्हणाले की मला इतर सत्कारापेक्षा मायभूमीने केलेला सत्कार महत्त्वाचा असून तो मी कदापि विसरणार नसुन यापुढे युवकांना देश सेवा करण्यासाठी मार्गदर्शन करणार आहे देशसेवा हि ईश्वर सेवा असल्याचे सांगत प्रत्येकाने घरातून एक फौजी देश सेवेसाठी समर्पित करावा आवाहन करून माझ्यावरील असलेले प्रेम असेच कायम ठेवा असेही त्यांनी बोलताना सांगितले. यावेळी जि .प शाळा व आदर्श विद्यालयातील सर्व विद्यार्थी तसेच गावातील व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चिंतेश्वर पाणपोई चे उद्‌घाटन शिवराज पवार यांच्या हस्ते संपन्न

गेवराई ,दि.१६ (लोकाशा न्यूज) : गेवराई शहरातील कोल्हेरवेस तहसील रोड रोड दाभाडे गल्ली येथे महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे तालुका अध्यक्ष नागेश पंडित यांनी सामाजिक भान लक्षात घेऊन पाणपोई सुरू केली आहे तिचे उद्घाटन युवा नेते शिवराज दादा पवार, यांच्या हस्ते करण्यात आले या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून नगरपरिषद गेवराईचे उपनगराध्यक्ष भगवान जिजा घुबर्डे, आदर्श शिक्षक माजी मुख्याध्यापक राजेंद्र घुंबर्डे सर प्रकाश आधार चे संपादक सुनील पोपळे नाभिक समाजाचे नेते नानासाहेब पंडित, बाप्पा जाधव, मोहन अप्पा



बेंद्रे, बाबासाहेब सावंत, सागर ठाकूर, गोरख मोटे , ऋषिकेश मोटे विजय पंडित हरि पंडित फुले शिवांश पंडित रवी दाभाडे, बाबा वाघमारे, गणेश भुते, नारायण जगताप, नारायण मुलुक, माजी नगरसेवक शाम काका येवले,राजेंद्र मोटे ,रमेश मोटे प्रेम मोटे राहुल भैया मोटे भाऊसाहेब नाना दाभाडे, अशोकरावजी मडकर, शिवाजीराव लिंगशे,अक्षय आंभाईक कर, रवी मडके, नंदू शिदे आदी मंडळी उपस्थित होते.

## महाशिवरात्रीनिमित्त ५१ जोडप्यांनी केला महारूद्राभिषेक

अंबाजोगाई,दि.१६ (लोकाशा न्यूज) : येथील एकता मैत्री फाऊंडेशन अंबाजोगाई यांच्यावतीने महाशिवरात्रीच्या निमित्ताने माळी नगर येथील श्रीकृष्ण मंदिर व कुबेरेश्वर मंदिरात महारूद्राभिषेक करण्यात आला. यावेळी या अभिषेकास ५१ जोडप्यांनी एकत्रित येवून महारूद्राभिषेक केला.



यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बळीरामजी चोपणे सर ,पत्रकार अविनाश मुडेगावकर, नगरसेवक डॉ. अतुल देशपांडे, नगरसेवक आकाश कर्हाड, नगरसेवक महेश अंबाड,नाना गायकवाड, प्रकाश बोरगावकर, माजी सैनिक केंद्रे, माजी सैनिक माने नारायण चाटे, रहीम शेख तसेच भक्तगण, महिला व विधिवत पूजा-अभिषेक करण्यासाठी पुष्कर जहागीरदार हे त्यांच्या ब्राह्मण सहकार्यां सोबत आदी मान्यवरांची उपस्थिती होती.या कार्यक्रमासाठी एकता मैत्री फाऊंडेशनचे अध्यक्ष श्रीकृष्ण बाहेती सचिव दिपक शिनगारे, श्रीहरी साखरे, अमोल माने, गोविंद वेदपाठक, सागर साखरे, आकाश चोपणे, प्रविण चोपणे, मोहित कराड, राहुल माळी, प्रदिप चोपणे, रमेश चोपणे यांच्यासह एकता मैत्री फाऊंडेशनचे सदस्य व परिसरातील भाविक उपस्थित होते.यावेळी सिहोरचे अंतरराष्ट्रीय शिवकथा वाचक गुरूदेव पं.प्रदिपजी मिश्रा यांच्या आश्रमातील विधिपुर्वक मंत्रीत केलेले ३०० रूद्राक्ष वाटप करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास शहर व परिसरातील शिवभक्तांना महाप्रसाद वाटण्यात आला. या कार्यक्रमाला असंख्य भक्तांनी हजेरी लावली होती.

## पणत्यांच्या प्रकाशात उजळला नृसिंह तीर्थ परिसर महाशिवरात्री निमित्त उपक्रम

अंबाजोगाई,दि.१६ (लोकाशा न्यूज) : ऐतिहासिक वारसा असणाऱ्या शहरातील सर्वज्ञ दासोपंत समाधी परिसरात नृसिंह(तीर्थ)बारव याठिकाणच्या परिसरात हजारो पणत्याच्या प्रकाशात हा परिसर उजळून निघाला. महाराष्ट्र सांस्कृतिक गणेश मंडळ देशपांडे गल्लीच्या वतीने महाशिवरात्रीच्या निमित्त्याने दिव्यांची रोषणाई करण्यात आली.



महाशिवरात्री निमित्ताने सांयकाळी सर्वज्ञ दासोपंत समाधी परिसरातील ऐतिहासिक नृसिंह (तीर्थ)बारवाची तसेच नृसिंह मंदीर, शिवमंदीर परिसराची स्वच्छता करून पायऱ्या, कठडे, बारव यात दिवे ( पणत्या) लावून रोषणाई करण्यात आली यावेळी सागर दिक्षित, श्रेयस गोस्वामी, सुमित केजकर, डॉ. प्रज्वल देशपांडे, अमोल कुलकर्णी, पत्रकार राहूल देशपांडे, आकाश कऱ्हाड, बारव संवर्धन समिती सदस्य एस. बी. शिंदे, ॲड. राजेंद्रप्रसाद धायगुडे, भागवत मस्ने, पत्रकार अविनाश मुडेगांवकर, कमलाकर देशपांडे, संजय भालेराव, श्रीकांत कुंभेफळकर आदीसह महिला, पुरुष, इतर भाविक भक्त उपस्थित होते.

**नाविन्यपूर्ण उपक्रम**

सर्वज्ञ दासोपंत समाधी परिसरातील ऐतिहासिक वारसा असणाऱ्या नृसिंह (तीर्थ)बारव परिसर हजारो पणत्यांची रोषणाई करण्यात आली महाशिवरात्र निमित्त्याने हा दीपोत्सव साजरा झाला.असा उपक्रम धार्मिक स्थळाचे महत्व वाढविण्यासाठी आवश्यक असून पुढेही सर्वांच्या सहकार्यातून होण्याची गरज आहे.

## रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर स्वच्छता,पाणी पुरवठा नियमित करा

### राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांचे निवेदन

अंबाजोगाई,दि.१६ (लोकाशा न्यूज) : मुस्लिम समाजाच्या पवित्र रमजान महिन्यास बुधवार, दिनांक १८ किंवा गुरूवार, दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी पासून प्रारंभ होण्याची शक्यता आहे (जो चंद्राच्या दर्शनावर अवलंबून असेल) या पार्श्वभूमीवर स्वच्छता, पाणी पुरवठा नियमित करून वीज पुरवठा अखंडीत ठेवा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष अमर दगडुसाहेब देशमुख यांनी मुख्याधिकारी, नगरपरिषद अंबाजोगाई व उपअभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांना सोमवारी दिलेल्या निवेदनातून केली आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष अमर दगडुसाहेब देशमुख यांनी मुख्याधिकारी, नगरपरिषद अंबाजोगाई यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मुस्लिम समाजाच्या पवित्र रमजान महिन्यास बुधवार, दिनांक १८ किंवा गुरूवार, दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी पासून प्रारंभ होण्याची शक्यता आहे (जो चंद्राच्या दर्शनावर अवलंबून असेल). या महिन्यात मुस्लिम बांधव उपवास करतात. तरी किमान मुस्लिम बहुल भागात नियमित उच्च दाबाने सकाळच्या वेळेत पाणी पुरवठा करण्यात यावा. तसेच या महिन्यात नमाज पठण करण्यासाठी प्रार्थना स्थळे (मस्जिद) जाण्या-येण्याच्या मार्गावर स्वच्छता ठेवण्यात यावी. या रस्त्यावरील नाल्या नियमित स्वच्छ करण्यात याव्यात. तरी मे.साहेबांनी संबंधित विभागाला वरील सर्व बाबींची पूर्तता करण्यासाठी सूचना देवून अंमलबजावणी करण्याचे आदेश द्यावेत अशी विनंती करण्यात आली आहे. तसेच उपअभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, पवित्र रमजान महिन्यात मुस्लिम भगिनींना पहाटे सहरी करण्यासाठी लवकर उठून स्वयंपाक करावा लागतो. तसेच येणारा महिना हा उन्हाळ्याचा असल्याने व मुस्लिम बांधवांना उपवास असल्याने दिवसभरात पंखा, कुलरची आवश्यकता असते. त्यामुळे किमान मुस्लिम बहुल भागात वीज पुरवठा अखंडित ठेवण्यात यावा. सदरील सर्व बाबींची पूर्तता करण्यासाठी संबंधितांना सूचना देवून अंमलबजावणी करण्याचे आदेश द्यावे अशी विनंती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष अमर दगडुसाहेब देशमुख यांनी केली आहे. निवेदन देताना नगरसेवक राजपाल जावळे व नगरसेवक नजीर मुन्ना पठाण यांची उपस्थिती होती. तर सदरील निवेदनावर ॲड.इस्माईल गवळी, राहुल सिरसट, हमीद चौधरी, आमेर चौधरी, सलिम गवळी, जावेद पप्पुवाले, सिद्धू लोमटे, आसेफ प्यारेवाले, अरशद खाँन पठाण, जुबेर पठाण, इरफान खाँन पठाण, सलिम पिंजारी आदींसह इतरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## राज्यस्तरीय पुरस्कार ही माझ्या आयुष्यातली मोठी कमाई– गुलाब भाई शेख

**राज्यमंत्री बच्चुभाऊ कडू.रविकांत दादा तुपकर यांच्या हस्ते राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत कर्मचारी पुरस्कारने सन्मानित**



राजेवाडी ,दि.१६ (लोकाशा न्यूज):- माजलगाव तालुक्यातील मौजे कल्याणनगर येथील ग्रामपंचायत शिंपेटाकळी कर्मचारी व टायगर ग्रुप सामाजिक संघटना कार्यकर्ते गुलाब भाई शेख यांच्या कार्याची दखल घेत गुलाब भाई शेख यांना माजी राज्यमंत्री बच्चुभाऊ कडू व राज्यमंत्री रविकांत दादा तुपकर, खासदार भाऊसाहेब वाकचौरे साहेब व वर्ष २०२६ ज्यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर असे कलावंत रघुवीर खेडकर साहेब यांच्या हाताने प्रसिद्ध तीर्थस्थळ नाशिक सिन्नर या ठिकाणी सनमानीत करण्यात आले यांना महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघ माजलगाव तालुका व बीड जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचारी संघटणा बांधणी मजबुत संघटीत करुन ग्रामपंचायत कर्मचारी कामगारासाठी अहोरात्र काम करत त्यांचे प्रलंबित प्रश्नावर मोर्चे उपोषण करून संविधानाने दिलेल्या अधिकाराचा वापर करून न्याय मिळुन दिल्याचे काम केले.ग्रामपंचायत कर्मचारी हा गाव खेड्यातला सर्वात शेवटचा घटक असुन तो सर्वात महत्वाचा आहे हे लक्षात आनुन देन्याचे काम करत आहेत तूट पुंज्या वेतनावर हा कर्मचारी काम करत असतो व सर्व गावातील जनतेला सेवा देतो म्हणूनच मला राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत कर्मचारी गुणगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो व मला सामाजिक कार्याची आवड आसल्यामूळे मी सतत गोर गरीब दिन दुबळ्याच्या कामाला सर्व प्रथम प्राधान्य देतो व मी ग्रामपंचायत कर्मचारी आसल्यामुळे माजलगाव तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत कर्मचारी व माझ्या गावचे सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी साहेब व गावातील युवा नेते कार्यकर्ते व वरिष्ठ मार्गदर्शक जेष्ठ नागरिक नागरिकांकडून अभिनंदन होत आहे

लोकाशा
मंगळवार दि.१७ फेब्रुवारी २०२६


## महसूलच्या १६ कर्मचाऱ्यांना पदोन्नती

बीड, दि.१६ (लोकाशा न्युज) :- जिल्हा महसूल विभागातील १६ कर्मचाऱ्यांना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी काल पदोन्नती दिली आहे. यात महसूल सहायक सुरज लक्ष्मणराव मुळे, सय्यद अलिम सय्यद मोईनोद्दीन, सुधाकर नागरगोजे, वसीम शेख, मन्मथ पटणे, संजय राजपूत, अतूल मिटकरी, श्रीमती सुरेखा ढाकणे यांना सहायक महसूल अधिकारीपदी, ग्राम महसूल अधिकारी श्राग्यश्री गिते, गणेश गावडे, व्ही.के. थडकर, नंदा शिंदे, प्रदिप बाबर यांना मंडळधिकारी पदी तर शिपाई अमोल गिरी, विजय कनके, श्रीमती स्नेहा परचाके यांना महसूल सहायक पदी पदोन्नती देण्यात आली आहे.

# चोवीसे विद्यार्थ्यांना इंग्लिश स्कूलमध्ये मोफत प्रवेश

## आजपासून आरटीई प्रवेश प्रक्रिया सुरू

## १० मार्चपर्यंत भरता येणार अर्ज




बीड, दि.१६ (लोकाशा न्युज) :- शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळांमधील २५ टक्के राखीव जागांसाठी राबविण्यात येणाऱ्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेला आज मंगळवार (दि. १७ फेब्रुवारी) पासून सुरुवात होत आहे. त्यानुसार पालकांना मुलांचे अर्ज १० मार्चपर्यंत भरता येणार आहे. दरम्यान, जिल्ह्यातील २ हजार ४०० विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश दिले जाणार आहेत.

आर्थिक दुर्बल व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण हक्क कायद्यानुसार इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. यंदाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी ९ जानेवारी रोजी शाळा नोंदणी प्रक्रिया सुरू झाली होती. मुदतवाढीसह ही प्रक्रिया ३० जानेवारी रोजी बंद करण्यात आली. जिल्ह्यात प्रवेशासाठी २१३ शाळांची नोंदणी झाली असून २ हजार ४०० जागा उपलब्ध आहेत. मंगळवारपासून प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रियेला ▶▶ पान ५ वर

### ही कागदपत्रे अपलोड करणे अनिवार्य

आई किंवा वडिलांचे आधार कार्ड, बालकाचे जन्मप्रमाणपत्र व वास्तव्याचा पुरावा, भाडेतत्त्वावर राहणाऱ्या पालकांच्या बाबतीत दुय्यम निबंधक कार्यालयातील नोंदणीकृत भाडेकरारनाम्याची प्रत (सर्व संबंधित घटकांसाठी अनिवार्य), सामाजिक वंचित घटकांसाठी – पालकांचा/बालकाचा जात दाखला व अपंगत्वाचे प्रमाणपत्र, आर्थिक दुर्बल घटकांसाठी – पालकांचा वार्षिक उत्पन्नाचा दाखला रुपये एक लाखांपेक्षा कमी (सन २०२३–२४ किंवा २०२४–२५ या वर्षांतील दाखला ग्राह्य)

### पोद्दार इंग्लिश स्कूलचे अल्पसंख्यांक प्रमाणपत्र तात्काळ रद्द करा–मनोज जाधव



पोद्दार इंग्लिश स्कूलने आरटीई प्रवेशातून पळवाट काढण्यासाठी अल्पसंख्यांक प्रमाणपत्र घेतले असून हे प्रमाणपत्र नियमबाह्य पद्धतीने शासनाकडून देण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. शाळा सुरू झाल्यानंतर आरटीई प्रवेश टाळण्यासाठी अशा प्रकारे प्रमाणपत्र देणे चुकीचे असल्याचे मत मनोज जाधव यांनी व्यक्त केले आहे. या संदर्भात मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री व शिक्षण संचालक यांच्याकडे रीतसर तक्रार दाखल करण्यात आली असून संबंधित शाळांना देण्यात आलेले अल्पसंख्यांक प्रमाणपत्र तात्काळ रद्द करावे, अशी मागणी मनोज जाधव यांनी केली आहे.

## आष्टी तालुक्यात अतिवृष्टी अनुदान वाटपावर प्रश्नचिन्ह

### दुबार लाभ, अपात्रांना अनुदान, खऱ्या नुकसानग्रस्तांची उपेक्षा? चौकशीची मागणी



कडा, दि.१६ (लोकाशा न्युज) :- राज्य शासनाकडून सन २०२३, २०२४ आणि २०२५ या कालावधीत अतिवृष्टीग्रस्तांसाठी सरसकट अनुदान वितरित करण्यात आले. मात्र या अनुदान वाटप प्रक्रियेवर गंभीर शंका उपस्थित होत असून काही तलाठी स्तरावर अनियमितता झाल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. काही लाभार्थ्यांना दुबार अनुदान तर काहींना जमीन नसतानाही मदत मिळाली असल्याची चर्चा रंगली आहे.

याबाबत उपविभागीय अधिकारी माजलगाव यांनी चौकशी करून खुलासे सादर करण्याबाबत आदेशित केलेले होते. परंतु अद्यापही काही तलाठी यांनी आपले खुलासे सादर केलेले नाहीत, म्हणजेच अनुदान प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात गोंधळ असल्याच्या संशयाला बळ मिळत आहे. यासंदर्भात खुलासे सादर न करणे, सदरील प्रकरणांमध्ये गप्प बसणे यावरूनच या प्रकरणात काहीजण दोषी तर नाहीत ना, असा प्रश्न शेतकरी उपस्थित करत आहेत. विशेषतः कड्यासह परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी पावसाच्या तडाख्यात खरडून गेल्या, पिकांसह व्यवसायिकांचे ▶▶ पान ५ वर

## बीडकरांची सेवा स्वच्छ मनाने करणार–आ.विजयसिंह पंडित

### संत गाडगेबाबा स्वच्छता मिशन ५२ चा शिवरात्री पवित्र रमजान पूर्वसंध्येला शुभारंभ



बीड, दि.१६ (लोकाशा न्युज): शहराच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत संत गाडगेबाबांच्या प्रेरणेने राबविण्यात येणाऱ्या संत गाडगेबाबा स्वच्छता मिशन ५२' या व्यापक अभियानाचा आज उत्साहपूर्ण वातावरणात शुभारंभ आमदार विजयसिंह राजे पंडित यांच्या हस्ते संपन्न झाला. स्वच्छता हीच सेवा आणि स्वच्छ शहर हीच ▶▶ पान ५ वर

## कर्तृत्वातून ठसा उमटविणाऱ्या लोकनेत्या

# 'प्रीतमताई द फायटर'



शिकलेली आई घर पुढे नेई', अशी आपल्याकडे एक म्हणं आहे, अगदी या म्हणीप्रमाणेच माजी खा. प्रीतमताईंचे नेतृत्व, दातृत्व आणि कर्तृत्व बीड जिल्ह्याच्या विकासासाठी कामी आलेले आहे. कारण बीड जिल्ह्यातील अनेक महत्वाचे प्रश्न त्यांच्या अभ्यासू नेतृत्वामुळे खऱ्या अर्थाने मार्गी लागलेले आहेत. त्यामुळेच एक दबंग, कणखर खासदार म्हणूनही त्यांच्याकडे पाहिले गेले. विशेष म्हणजे शांत, संयमी आणि मृदूभाषेने ताईंचा राजकिय कसब सिध्द झालेला आहे, हे कोणालाही नाकारता येणार नाही, कोणताही गाजावाजा न करता त्यांनी विकासासाठी अनेक कामे हाती घेतले होते आणि ते आपल्या दहा वर्षाच्या काळात त्यांनी पुर्णही केले. त्यामुळेच तर जिल्ह्यात त्यांची लोकप्रियता कायम आहे. मागच्या अनेक वर्षांपासून रेंगाळलेला बीड रेल्वेचा प्रश्नही लोकनेत्या पंकजाताईंसह माजी खा. प्रीतमताईंच्या माध्यमातून मार्गी लागलेला आहे. विशेष म्हणजे आता ही रेल्वे हळूहळू परळीपर्यंत पोहचत आहे. बीडकरांच्या जिव्हाळ्याचा हा प्रश्न सुटत असल्यामुळे बीड जिल्ह्यातल्या प्रत्येक माणसाच्या मनात खा. प्रीतमताईंनी आपुलकीचे घर निर्माण केलेले आहे. त्यामुळेच तर कोणत्याही संकटात लोकनेत्याच्या ह्या विकास कन्येची कधीच साथ सोडायची नाही, असा निर्धारच बीड जिल्ह्यातील अनेकांनी केलेला आहे. या लढवय्या असणाऱ्या प्रीतमताई ह्या बीड जिल्ह्यासाठी एक मोठी ताकत असल्याचे स्पष्ट होत आहे. बीडची कणखर ताकत असलेल्या याच लेकीचा आज वाढदिवस असून त्यांच्यावर जिल्ह्यातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

देशाच्या आणि राज्याच्या राजकारणातील एक बुलंद तोफ म्हणून स्व. गोपीनाथराव मुंडेंची ओळख होती, त्यांच्यामुळेच बीड जिल्ह्यातील अनेक प्रश्न मार्गी लागले, साहेबांमुळेच बीड जिल्ह्याचे नाव खर्या अर्थाने देशाच्या नकाशावर गेले, पुढे त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून पंकजाताईंनी समाजकारणाबरोबरच राजकारणात आगदी साहेबांप्रमाणेच स्वत:ची ओळख निर्माण केली, साहेबांच्या निधनानंतर लोकनेत्या पंकजाताईंनी प्रितमताईंना राजकारणात आणले, अगदी पहिल्या पाचच वर्षात प्रीतमताईंनीही स्वत:चे कर्तृत्व आपल्या कामातून सिध्द करून दाखविले. ▶▶ पान ५ वर

### धाडसी आणि आक्रमक नेत्या

लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या डॉ. प्रीतमताई मुंडे ह्या व्दितीय कन्या आहेत, त्या अत्यंत संयमी आणि शांतप्रिय स्वभावाच्या नेत्या आहेत. आपल्या वडिलाप्रमाणेच जनसमान्यांचे प्रश्न जाणून घेत त्यांनी लोकसभेत सलग दहा वर्ष आपला आवाज उठविला. यातून जिल्ह्याचे महत्वाचे प्रश्न खर्या अर्थाने मार्गी लागले. विशेष म्हणजे त्यांच्या माध्यमातून एक धाडसी आणि आक्रमक नेतृत्वाचा उदय झाला, ही बीड जिल्ह्यासाठी मोठी भाग्याची गोष्ट आहे.




## बीडमध्ये अंबिका चौक, राजीव गांधी चौकातील सर्व अडथळे तत्काल हटवा

### भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या बीड नगरपरिषद प्रशासनाला सूचना



बीड,दि.१६(लोकाशा न्युज): दि.१६ : शहरातील अत्यंत वर्दळीचे अंबिका चौक आणि राजीव गांधी चौक येथील वाहतूक कोंडी कमी करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी निर्माण झालेले सर्व प्रकारचे अडथळे तात्काळ हटविण्याच्या सूचना भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बीड नगरपरिषद प्रशासनाला दिल्या. यासंदर्भात त्यांनी मुख्याधिकारी शैलेश फडसे आणि संबंधित यंत्रणेसोबत सोमवारी (दि.१६) दोन्ही चौकांची प्रत्यक्ष पाहणी केली.

अंबिका चौकातील सुशोभीकरणामुळे वारंवार निर्माण होणारा ▶▶ पान ५ वर

## सुभाष सपकाळ यांची राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) पक्षाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती–राजेंद्र मस्के



बीड, दि.१६ (लोकाशा न्युज): राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मा.आ. शशिकांत शिंदे यांच्या आदेशानुसार नगर परिषद माजी सभापती सुभाषराव सपकाळ यांची बीड जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असून आमदार संदीप क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के, माजी आमदार सय्यद सलीम यांनी सपकाळ यांना नियुक्तीपत्र प्रदान करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या वेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सुभाषराव सपकाळ यांचे हार्दिक अभिनंदन केले. ▶▶ पान ५ वर

## मागण्या मान्य होत नसल्यामुळे पुन्हा सहशिक्षक धायगुडे,उपरे उपोषणाला बसले

बीड,दि.१६ (लोकाशा न्यूज) : आपल्या मागण्या मान्य होत नसल्यामुळे शारदा विद्या मंदिर माध्यमिक विद्यालय जिरेवाडीचे सह शिक्षक महादेव रंगनाथराव धायगुडे आणि सतीश सुखदेव उपरे हे दोघे जण पुन्हा एखदा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसले आहेत. जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत आम्ही उपोषण सोडणार नाहीत, असा ईशारा त्यांनी यावेळी दिला आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, की शारदा विद्या. मंदिर माध्यमिक विद्यालय जिरेवाडी (ता. परळी वै जि. बीड) या शाळेतील आम्ही सहशिक्षक असून मा. साहेब आम्ही आपणास दिलेल्या निवेदनानुसार आमच्या मागण्या पूर्ण झालेल्या नाहीत, त्यामुळे आम्ही आपल्या जिल्हाधिकारी




कार्यालयासमोर दि. १६ फेब्रुवारी २०२६ पासून आमरण उपोषणास बसत आहोत, तरी मा. साहेब आमच्या मागण्या पूर्ण होणार नाहीत तो पर्यंत आम्ही आपल्या कार्यलया समोर आमरण उपोषणास बसणार आहोत, असे सहशिक्षक महादेव रंगनाथराव धायगुडे आणि सतीश सुखदेव उपरे यांनी म्हटले आहे. त्यानुसार कालपासून त्यांनी आपले उपोषण सुरूही केले आहे.

## राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचा आष्टीत भव्य शुभारंभ

### कृषी नवसंशोधन, तंत्रज्ञान आणि समृद्ध शेतीसाठी राज्यातील मान्यवरांची उपस्थिती

कडा, दि.१६ (लोकाशा न्युज) :- आष्टीचे माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून सलग तिसऱ्या वर्षी आयोजित डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचा उद्घाटन समारंभ गुरुवारी दि.१९ फेब्रुवारी रोजी सकाळी आष्टी येथे संपन्न होणार आहे. शेतकरी, कृषी तज्ज्ञ, विद्यार्थी आणि नागरिकांसाठी मार्गदर्शक ठरणाऱ्या या प्रदर्शनाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे, आ. प्रकाश सोळंके, माजी आ. अमरसिंह पंडित, माजी आ. बाळासाहेब आजबे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस सुरज चव्हाण, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, ▶▶ पान ५ वर

# ७ महिने लोटले, वाळूच्या कारवाईची माहिती गुलदस्त्यात

### उपविभागीय अधिकारी यांच्याकडे होती चौकशी, तक्रारदारांना अद्यापही मिळाली नाही कसलीच माहिती

अंमळनेर, दि.१६ (लोकाशा न्युज) :- पाटोदा तालुक्यातील अंमळनेर पोलीस ठाण्यात जप्त करण्यात आलेल्या वाळूलाचा पाय फुटले असल्याची रितसर तक्रार अंमळनेर पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार जालींदर बनसोडे यांनी ऑगस्ट २०२५ रोजी पोलीस अधिक्षक ते आष्टीचे उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या कडे करुन ७ महिने लोटले तरी तक्रार यांना अद्यापही कारवाई काय केली या बाबत माहिती देण्यात आलेली नसल्यामुळे सामाजिक कार्यकर्ते यांनाच या बाबत आवाज उठविण्याची वेळ आली आहे.

अंमळनेर पोलीस ठाणे हद्दीत सहा ब्रास वाळू वाहतूक करत असलेला हायवा वाहन पकडून त्याच्या वर अंमळनेर पोलीस ठाण्यात मे २०२५ मध्ये पोलीस हवालदार जालींदर बनसोडे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता . त्यानंतर ऑगस्ट मध्ये सहा ब्रास पैकी चार ब्रास वाळूला पाय फुटले अन् सहा ब्रास मधील अवघी दोन ब्रास वाळू पोलीस ठाणे आवारात शिल्लक असल्याचा दावा करत या प्रकरणाची ▶▶ पान ५ वर




### एसडीएमकडून देखील माहिती उपलब्ध नाही

एसडीएम पाटोदा यांच्याकडे देखील वाळू प्रकरणातील माहिती मागविण्यात आली. परंतु त्यांनी देखील तक्रारदारांना माहिती दिलेली नाही, उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्याकडून देखील माहिती देण्यात आलेली नसल्यामुळे तर सर्व पारदर्शक कारभार आहे तर माहिती का देण्यात आली नाही असा प्रश्न निर्माण होत आहे.